ऑक्टोबर 2015 | ₹ 40 | पृष्ठ संख्या 36 | पुणे, वर्ष 5 | अंक 11

# अर्थपूर्ण

आर्थिक साक्षरता +
पारदर्शकता =
स्वाभिमानी भारत



# शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारण शोधणे खरोखरच इतके अवघड आहे?

अर्थपूर्ण

संपादक
यमाजी मालकर

सहसंपादक
सम्राट शिरवळकर

editor.arthapurna@gmail.com

’अर्थपूर्ण’ पब्लिकेशन्स प्रा. लि.
11, ’हर्षदा’, रामबाग कॉलनी,
पौड रोड, पुणे 411038
फोन : 020- 25430540
www.arthapurna.org

ऑक्टोबर 2015

वर्ष पाचवे
अंक अकरावा

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्, पुणे.
9881098010

**व्यवस्थापन साहाय्य**
महेंद्र बनसोडे

**वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी**
व्यवहारासाठी संपर्क
020-25430540
9921926538
arthapurna.monthly@gmail.com

**जाहिरात संपर्क**
राजन मिडिया स्टेशन
9922920765
अर्चना जोशी
9552591874

‘अर्थपूर्ण’मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

‘अर्थपूर्ण’ हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. 31,34 पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-702, साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे 411038(सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले.
संपादक : यमाजी मालकर

# अनुक्रमणिका

04 **शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारण शोधणे खरोखरच इतके अवघड आहे?**.....यमाजी मालकर

12 **कर्जबळी**...अमर हबीब

17 **शेतीतून बाहेर पडण्यासाठीच**...मिलिंद मुरुगकर

19 **दुसरी हरित क्रांती?**

21 **‘मनोरुग्ण सरकारला ऐतखाऊंची मदत’**

23 **‘चलो आरबीआय’ला आरबीआयचे उत्तर**

25 **अर्थक्रांती अपडेट**

27 **अर्थक्रांतीच का?**

30 **अर्थक्रांतीच्या दिशेने**

31 **अर्थभान**

32 **आकडे बोलतात**

33 **गुंतवणूक टिप्स**

## भूमिका

# शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारण शोधणे खरोखरच इतके अवघड आहे?



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

**देशातील शेतकरी आत्महत्या का करत आहेत, याचा शोध सध्या समाजातले नेते, अभिनेते आणि अर्थतज्ञ घेत आहेत. पण हा शोध घेण्यासाठी काही हजार शेतकऱ्यांना बळी जावे लागले. गेले तीन शतके किंवा त्यापेक्षा अधिक काळ चालू असलेला हा शोध अजून थांबलेला नाही आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्याही थांबलेल्या नाहीत. खरे म्हणजे चिंतेत तर सर्वच आहेत. ताणतणाव नाहीत, असा समूह आज पाहायलाही मिळत नाही. पण आत्महत्या मात्र शेतकरी वर्गातील पुरुषच करत आहेत. असे का होते आहे, याचा हा शोध आहे.**

शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय यावर्षी पडलेल्या दुष्काळामुळे अधिक तीव्र झाला. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या तशी समाजात अस्वस्थता वाढू लागली. तेवढा आपला समाज जिवंत आहे तर! ज्यांना विषयाचे भांडवल करायला आवडते, ते राजकीय नेते आधी सरसावले, हे समजण्यासारखे आहे. त्या समूहांना नाव द्यायचे तर ते एक दीड वर्षांपूर्वी सत्तेवर असलेले काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आहेत. त्यांच्या पंधरा वर्षांच्या काळात आत्महत्या होतच होत्या आणि ते शोधण्यासाठी समित्याही नेमल्या गेल्या होत्या. पण गाडे काही पुढे सरकले नाही. आता सत्ताधारी भाजप शिवसेनेची जबाबदारी आहे. त्याच्या नेत्यांनीही दौरे करून पाहिले, पण त्यांनाही काही मार्ग सापडला नाही. या प्रश्ना विषयी




त्यांनी हतबलता व्यक्त केली. काहीही करायचे म्हटले की तिजोरीत पैसा नाही. त्यामुळेच सरकारचे उत्पन्न कसे वाढेल आणि राज्याची आर्थिक स्थिती कशी सुधारेल, याची स्पर्धा सरकारला जाहीर करावी लागली आहे. (अर्थक्रांतीच का? या विभागात सरकारचे आवाहन पहा पान २९ वर) आत्महत्या वाढल्याने काही अभिनेते सक्रिय झाले आणि त्यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना मदतीची योजना जाहीर केली, एवढेच नव्हे तर सरकारच्या प्रशासकीय मदतीने थेट मदतीचे वाटप केले. काही अर्थतज्ञांची कातडी इतकी जाड आहे की, त्यांना काहीच फरक पडत नाही. त्यांचे पगार एक तारखेला नियमितपणे होत आहेत. आता राहिला मिडिया. त्याने ओरड केली म्हणून तर एवढी चर्चा तर झाली. पण तेही तात्कालिकच. कारण त्याला दुसरा काही विषय मिळाला की तो तिकडे पळणार, हे ठरलेले आहे. मग काहीच नसेल की पुन्हा मोर्चा आत्महत्यांकडे, हे असेच चालले आहे.

पण मग खरोखरच शेतकरी आत्महत्या का करत आहेत? आणि

काय केले तर त्या रोखल्या जातील? या प्रश्नाची अर्थक्रांती संदर्भातील ही मांडणी आहे. ती या प्रश्नाच्या मुळाशी भिडणारी यासाठी आहे की, जेथे या प्रश्नाच्या ठोस उत्तरावर बोलण्याची वेळ येते, तेव्हाच ती चर्चा आत्तापर्यंत थांबविण्यात आली आहे. ही चर्चा तेथून सुरू होते. तुम्ही एक प्रयोग करून पहा. या विषयावर केलेल्या सर्व लेखनात सरकारवर तोंडसुख घेण्यात येते आणि नेमके काय करायला हवे, असे काही सांगण्याची वेळ आली की, 'याचा कोणीतरी शोध घेतला पाहिजे' असा शेवट करून ते तसेच सोडून देण्यात येते. असे या प्रश्नाची टोलवाटोलवी सुरू आहे. या टोलवाटोलवीचा शेवट करण्याची वेळ आता जवळ आली आहे. याचा अर्थ 'याचा शोध घेतला पाहिजे' असे जेथे म्हटले जाते, तेथूनच सुरुवात केली पाहिजे.

तो शोध अर्थक्रांती आपल्या बाजूने असा घेते.

1. पैशांचे महत्त्व वाढले नव्हते, तोपर्यंत शेतकरी एवढा अडचणीत नव्हता. धान्याच्या रूपात शेतसारा घेतला जात होता, मात्र इंग्रजांनी ही पद्धत सक्तीने बंद करून शेतसारा रुपयात घेण्यास सुरुवात झाली. तेव्हापासून शेतकरी पैशांच्या व्यवहारांच्या मैदानात आला. पण त्याला पैशांचा हा खेळ नीट कधी खेळता आला नाही.
2. जागतिकीकरण आणि त्यामुळे झालेल्या बदलांनी पैशाला राक्षसाची ताकद बहाल केली. ती ज्यांनी ओळखली, ते समूह उत्पादन प्रक्रियेत नसतानाही उत्तम आयुष्य जगू लागले. विशेषतः ज्यांनी दलाली व्यवसायात जम बसविला त्यांना चांगले पैसे मिळू लागले, पण हा सर्व व्यवहार शेतकऱ्यांच्या शोषणावर उभा राहिला.
3. शेतकरी संघटित नसल्याने कशाचे किती उत्पादन घ्यावे, हे तो कधीच ठरवू शकला नाही. उत्पादन वाढीच्या स्पर्धेत त्याने माल तर उत्पादित केला, पण त्यासाठीच्या बाजारपेठेचे नियम त्याच्या हातात कधीच राहिले नाहीत.
4. शेतकऱ्यांना संघटित करण्याची आणि त्याला त्याच्या कष्टाचा मोबदला मिळेल, अशी व्यवस्था सरकारने करणे अपेक्षित होते. पण राज्यकर्त्या वर्गात शेती माहीत असलेल्याचे प्राबल्य असूनही ती इच्छाशक्ती राजकीय नेतृत्वाकडे कधीच आली नाही. शहरात पैसे आणि सत्ता केंद्रित झाल्याने त्यांनी शहरे जवळ केली. असे सर्व राजकीय नेते शहरांत राहू लागले.
5. हवा, पाणी, रक्त हे प्रवाही हवे आणि शुद्धही हवे. दुसऱ्या शब्दांत ते प्रवाही असेल तरच शुद्ध असते. जीवन चालण्यासाठी जसे हवा, पाणी आणि रक्ताचे महत्त्व आहे, तेच महत्त्व पुढे पैशाला आले. पैसा एकाच ठिकाणी गोठून टाकण्याचे नवनवे मार्ग आधुनिक समाजाने शोधले. त्याला वस्तू करून टाकले. ते आता विनिमयाचे साधन न राहता ताब्यात ठेवण्याची वस्तू झाले. याचे इतके केंद्रीकरण झाले की जेथे फक्त शेतीवरच उपजीविका चालते, अशा विदर्भ, तेलंगणा, रायलसीमा, मराठवाडा अशा भागांत अर्थव्यवहार रोडावण्याची सुरुवात झाली. तो इतका रोडावला की शेतकऱ्याच्या हातात पैसाच टिकेनासे झाला. त्यातून कर्जाचे दुष्टचक्र सुरू झाले.
6. अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना बँकांतून कर्ज मिळणे अपेक्षित होते, पण तो बँकांशी जोडलेला नसल्याने त्याला पुन्हा सावकाराकडेच जावे लागले. शिवाय शेतीतून कर्ज फेडण्याइतका पैसा मिळत

## आज मी वाचवेन, पण उद्या काय?



'कोणताही गाजावाजा न करता बीडमधील एका मंगल कार्यालयात हा समारंभ झाला. सभागृह जेमतेम अर्धेच भरले होते. मात्र, या कार्यक्रमात स्थानिक रहिवासी गौतम खतोड यांनी एक लाख 12 हजार रुपये या उपक्रमासाठी दिले. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याच्या वारसांना 13 हजार 200 रुपये देता आले. 13 हजार रुपये मदत आणि 200 रुपये त्यांचा प्रवासखर्च!

दुसऱ्या दिवशी नागपूरमध्ये असाच मदत वाटप कार्यक्रम झाला. तिथे 62 जणांना प्रत्येकी 15 हजार रुपये देण्यात आले. या उपक्रमात पडल्यानंतर हा प्रश्न किती भीषण आहे याची प्रकर्षाने जाणीव होऊ लागली. बीडच्या कार्यक्रमात दोन महिन्यापूर्वीच पतीचे निधन झालेल्या ज्योती मोराळे ताईंनी नाना पाटेकर यांच्या 'क्रांतिवीर' सिनेमातील एका प्रसंगाची आठवण उपस्थितांना करून दिली. त्या प्रसंगात आपल्या आईची गुंडांच्या तावडीतून सुटका करावी या अपेक्षेने आलेल्या मुलास सिनेमातील क्रांतिवीर नाना **'आज मी वाचवेन; पण उद्या काय?'** असा प्रतिसवाल करतो. परतीच्या प्रवासात नाना पाटेकरांसह आम्ही सर्वच जण अंतर्मुख झालो होतो. आपण दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना करीत असलेली मदत ही तात्पुरती मलमपट्टी आहे याची आम्हांला जाणीव होतीच; ती या प्रसंगानंतर अधिकच टोकदार झाली'.

**मकरंद अनासपुरे, (एका लेखात)**

नसल्याने तो कर्जाने पिचून गेला.

7. मुलांचे शिक्षण, लग्न, सणवार, आजारी पडल्यावर लागणारा पैसा आणि गावातला मान टिकविण्यासाठी ज्या प्रकारच्या खुल्या स्पर्धेत त्याला यावे लागले, तो तर सारा पैशांचा खेळ होता. प्रयत्न करूनही त्यात जे शेतकरी तग धरू शकले नाही, त्यांनी स्वत:ला संपवून टाकण्याचा निर्णय घेतला. कारण तो इतका हतबल झाला होता की त्यापुढे त्याला जो अपमान आणि लाचारी दिसत होती, ती सहन करण्याच्या पलीकडची होती. त्याच्या वैयक्तिक आयुष्याचाच विचार करायचा तर त्याने लाचारीला नाकारून स्वाभिमानाने मरण्याचा निर्णय घेतला.
8. आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाविषयी सहानुभूती व्यक्त करणारे सगळेच त्यांना पैशांत मदत करत आहेत, हे पुरेसे बोलके आहे. पैसा आणि भांडवल हे जर आत्महत्येचे कारण नसेल तर पैसाच का द्यावा लागतो, या प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे. (अर्थव्यवहार रोडावल्यामुळे छोट्या उद्योजकांच्या आत्महत्या सुरू झाल्या आहेत, याचीही येथे नोंद घ्यावी.)
9. पैसा नावाच्या राक्षसाने जो धुमाकूळ घातला आहे, त्याला काबूत आणणे ही गरज आहे. तो कसा काबूत येईल, हेच तर पाच प्रस्तावांतून अर्थक्रांती सांगते. अंतिमतः: त्या आधारे येणारी व्यवस्थाच या आत्महत्या थांबवू शकतील. पण ती व्यवस्था येण्यास जो वेळ लागणार आहे, त्या काळात शेतकऱ्यांना शेती करत असल्याबद्दल नियमित पगार देण्याची गरज आहे.
10. आणखी एक... शेतकऱ्यांनी काय करावे आणि कसे जगावे, याविषयीची प्रवचने थांबविण्याची आता गरज आहे. कारण त्यातून तो जगण्यास लायक नाही, असाच संदेश जातो आहे. विशेषतः शेती आधारित व्यवस्थेत ज्यांना जगता आले नाही आणि ज्यांच्यावर शहरांत पळून येण्याची वेळ आली, त्यापैकी अनेकजण (विशेषतः पांढरपेशा समाज) उत्पादकाचे शोषण करूनच जगत आहेत आणि जे शेतकऱ्यांना मदत करत आहेत, त्यांच्याकडे असलेला पैसा या शोषणातून उभा राहिला आहे, याचे भान ठेवावे. त्यांना या प्रश्नाविषयी खरोखरच गांभीर्य असेल तर भेदभावमुक्त व्यवस्थेचा आग्रह धरण्याचे धाडस त्यांनी करून दाखवावे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारण शोधणे खरोखरच इतके अवघड आहे? आणि ते कारण हे नसेल तर कोणते आहे, याविषयी एक जाहीर मंथन लवकरच आयोजित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यात आपण सहभागी होऊन समाजावर लागलेला हा कलंक धुऊन टाकण्याच्या दिशेने ठोस पावले टाकली पाहिजेत.

**(महाराष्ट्रातील आपद्ग्रस्त कुटुंबीयांना नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांनी पुढाकार घेऊन मदत केली, त्याबद्दल त्यांना धन्यवाद. पण त्यांनंतर जे प्रश्न उपस्थित होत आहेत, त्यातील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न मकरंद अनासपुरे यांनीच 'लोकसत्ता' त लिहिलेल्या लेखात उपस्थित केला आहे, तो आहे 'पण उद्या काय' या प्रश्नाचे उत्तर कोणीच देत नाही. कारण ते**



## नाना, हे कसे शक्य आहे?

'महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील परिस्थिती अत्यंत दयनीय असून एक-दोघांना ती सुधारता येणार नाही. सरकारच्या धोरणाबाबत अनभिज्ञ असून सरकारच्या मदतीची वाट पाहणार नाही. शक्य होईल तेवढी मदत मी करणार आहे. शहरातील नागरिक संवेदनशील असून 'नाम फाउंडेशन' स्थापन केल्यानंतर एका दिवसात बरीच मोठी रक्कम जमली आहे'.

**नाना, ते निसर्गापुढे नाही, व्यवस्थेपुढे हरले आहेत...**

'आयुष्यात मी कधीच हरलो नाही. मला हार आवडत नाही. मी शेवटपर्यंत हरणार नाही. कोणत्याही शेतकऱ्याने हार मानू नये आणि आत्महत्या करू नये. तुमचे संपूर्ण कुटुंब असताना तुम्हांला आत्महत्या करण्याचा अधिकारच नाही. माणूस म्हणून जन्माला आला आहात तर शेवटपर्यंत लढा. तुम्ही निसर्गापुढे हात टेकू नका. आम्ही तुमच्यासोबत आहोत'.

**नाना, त्यांना मार्केटिंग नाही करता येत...**

'आत्महत्या थांबवू शकू की नाही, हे माहीत नाही; पण दिलासा देण्याचे काम यातून होईल. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना आणि शेतकऱ्यांना दिलासा देणे, हाच तोडगा असावा'

'सध्या सणासुदीमध्ये चिनी वस्तू विकायला येतात. आपल्याकडील महिलांनी अशा वस्तू का तयार करायच्या नाही? त्यांनी अशा वस्तू तयार करून विक्री केली, तर कुटुंबाला हातभार लागेल. तालुका, जिल्ह्यांच्या ठिकाणी त्यासाठीचे मार्केट व्हावे, त्याची जाहिरात आम्ही करू'

## संजय पवार यांचा नाना आणि मकरंद अनासपुरे यांना सवाल



शेतमालाला भाव मिळावा यासाठी शेतकरी आंदोलन करीत होता तेव्हा तुम्ही कोठे होता? मॉलची वीज बंद करून शेतीचे वीजपंप सुरू करा अशी मागणी का नाही करत? सामान्य माणूस कररूपाने इतके पैसे सरकारला देतो. आता पुन्हा त्याच्याकडेच का मागितले जातात, शेतकरी अडचणीत येण्यापूर्वीच आपल्या प्रतिष्ठेचा उपयोग का केला नाही? आता चॅरिटी कसली करताय, अशा शब्दांत प्रसिद्ध लेखक-नाटककार संजय पवार यांनी अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या सामाजिक कार्याबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शेतमालाला भाव मिळावा यासाठी शेतकरी आंदोलन करीत होता. तेव्हा तुम्ही कोठे होता? असेही ते म्हणाले.

मल्टिप्लेक्सला जातो तेव्हा तिकिटासाठी 300 रुपये आणि पॉपकॉर्नसाठी 80 रुपये मोजताना आपण खळखळ करीत नाही. मग, कांदा 80 रुपये किलो झाला म्हणून एवढा गदारोळ कशासाठी केला जातो? बरं, कांदा वाढला तरी ती किंमत शेतकऱ्याला थोडीच मिळते? आडते आणि दलालांचेच फावते, याकडे लक्ष वेधून संजय पवार म्हणाले, एकदा पैसे दिले की भागले असे होते का? तुमचे तुम्ही बघून घ्या असे म्हणून चालणार नाही. खासदार राजू शेट्टी यांची स्वाभिमानी शेतकरी संघटना का काही करत नाही? शेतकऱ्यांच्या आत्महत्येसाठी काही वेगळी कारणे आहेत का त्याचाही विचार झाला पाहिजे. एखाद्याला दैवत मानले की त्याला सारे गुन्हे माफ असतात अशीच आपली धारणा झाली आहे.

कलाकाराने परिवर्तनवादी असले पाहिजे, असे सांगून पवार म्हणाले,की कम्युनिस्ट विचारसरणीने चांगले साहित्य, नाटके, चित्रपट समाजाला दिले. विचारसरणीने कलाकार कुंठित होत नाही. नंतर, कम्युनिस्ट पोथीनिष्ठ झाले हे वास्तव असले तरी मूळ विचार परिवर्तनाचाच आहे. आधीचे साचे मोडले तरच नवीन निर्माण होते. त्यासाठी विद्रोह हा करावाच लागतो.

**झेपत नाही. ते उत्तर आहे, सरकार हा आपला बाप आहे, हे मान्य करा आणि त्यासाठी त्याला सक्षम करा. सरकारला आपली जबाबदारी म्हणून हे करावे लागणार आहे, दान म्हणून नव्हे, पण हा मुद्दा आला की सगळ्यांची बोलती बंद होते. असे का होते आहे?)**

## पैसा नाचवितो, म्हणून नाकारलेपण...

- सरकारी समित्या नेमून झाल्या, स्वयंसेवी संस्थांनी स्वतंत्र प्रयत्न करून पाहिले, माध्यमांनीही स्वतंत्र अहवाल तयार केले एवढेच नव्हे तर त्या त्या अहवालानुसार सरकारने काही उपाययोजना करून पहिल्या आणि हा क्रम गेली किमान तीन दशके सुरूच आहे. तरीही आत्महत्या थांबलेल्या नाहीत.
- महाराष्ट्राच्या कॅबिनेट बैठकीत



## शेतकऱ्यांना केलेल्या मदतीचे मार्केटिंग करणे, हा मूर्खपणाच!

**अभिनेता अक्षयकुमारचे परखड मत**

**वृत्तसंस्था, मुंबई**

असं म्हणतात की एका हाताने जे दान द्यावे, त्याची दुसऱ्या हातालाही खबर लागू नये. म्हणजेच एखाद्याला आपण मदत करत असाल तर त्याचा बडेजाव करण्यात काही अर्थ नाही. बॉलीवूडचा अभिनेता अक्षय कुमारचीही हीच भावना आहे. राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तब्बल 90 लाख रुपयांची मदत करण्याचा संकल्प अक्षयने केला आहे. मात्र, त्याबद्दल बोलण्यास त्याने नकार दिला. उलट 'आपल्या दातृत्वाची वाच्यता करणे हा मूर्खपणाच आहे,' असा टोलाही त्याने 'कथित' समाजसेवकांना लगावला.

अभिनेता नाना पाटेकर मकरंद अनासपुरे यांनी पुढाकार घेऊन संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबीयांना आर्थिक मदत दिली. त्यापाठोपाठ अक्षय कुमारनेही बीड जिल्ह्यातील 30 शेतकरी कुटुंबांना प्रत्येकी 50 हजारांप्रमाणे एकूण 15 लाख रुपये मदतीचे वाटप केले. विशेष म्हणजे, या कार्यक्रमाला स्वत: हजर राहण्याचेही त्याने टाळले. पुढील सहा महिन्यांत अशाच प्रकारे एकूण 180 शेतकरी कुटुंबीयांना 90 लाख रुपयांचे वाटप करण्याचा मनोदय अक्षयने केला आहे.

दिलेल्या आकडेवारीनुसार वर्षभरात राज्यात 724 शेतकऱ्यांनी तर उर्वरित देशात या काळात 112 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. याचा अर्थ देशात सर्वाधिक आत्महत्या महाराष्ट्रातील शेतकरी करत आहेत!

- दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत दिली, सवलतीत वीज दिली, शैक्षणिक शुल्क माफ करून झाले, तरीही आत्महत्या का थांबत नाहीत, असा प्रश्न एका सरकारी बैठकीत उपस्थित झाला आणि पुन्हा एक अभ्यास समिती स्थापण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांना करावी लागली. आता ही अभ्यास समिती काय शोधून काढते, हे पाहायचे.
- सवलती, अनुदान, मदत असे माणसाला लाचार करणारे तुकडे फेकण्याची पद्धत आता रूढ झाली आहे. हे तुकडे आज घेतले जातात, कारण पैशीकरण झालेल्या व्यवस्थेत जगण्याचे सगळे मार्ग पैशांच्या वाटेने जाऊ लागले आहेत. संसार रेटण्यासाठी या तुकड्यांचा उपयोग होतोच. मात्र त्यामुळे भारतीय माणसांत असलेला स्वाभिमान ठेचला जातो. असा स्वाभिमान ठेचला गेलेला बहुतांश भारतीय समाज आज गटागटाने ते 'परवडणारे' आयुष्य जगतो आहे. असे लाचार आयुष्य नाकारायचे तर नेमके करायचे तरी काय, असा गहन प्रश्न त्याच्यासमोर निर्माण झाला आहे.
- मुले आपले ऐकत नाहीत. त्यांच्या मागण्या आपण पूर्ण करू शकत नाही. ज्या इंग्रजी शिक्षणाचा बोलबाला आहे, ते शिक्षण आपण मुलांना देऊ शकत नाही. एवढेच काय पण आपल्या मुलीबाळींचे लग्न करण्याचे कर्तव्य बजावण्यातही आपण कमी पडतो आहोत. नव्या जगाच्या स्पर्धेत आपला निभाव लागत नाही आणि हे दुःख व्यक्त करण्यासाठीची ठिकाणेही राहिली नाहीत. धरणीमातेची पूजा म्हणून केला जाणारा हा व्यवसायच आतबट्ट्याचा झाला आहे. जो तो येतो आणि शेती कशी करायची ते सांगतो, कसे जगायचे ते सांगतो आणि तू किती जुनाट जगणे जगतो, याची सारखी जाणीव करून देतो. ही जी भावना नव्या व्यवस्थेने आज समाजात निर्माण केली आहे, ती त्याला आत्महत्या करायला भाग पाडते आहे.
- त्याच्या स्वाभिमानाला अशा किती ठेचा लागल्या आहेत, त्याची गणती नाही. याही परिस्थितीत त्याने उभे राहण्याचा प्रयत्न केला खरा, पण व्यवस्थेने खेळाचे सर्व नियमच बदलून टाकले आहेत. जो पैसा त्याला कुचकामी वाटत होता, तोच त्याला आता नाचवितो आहे. हे नाकारलेपण आजचे नाही. गेल्या शतकापासून ते त्याच्या मागे लागले आहे. केवळ एकविसाव्या शतकाच्या गोष्टी करणाऱ्या राजकीय नेत्यांना, शेती तज्ञ म्हणून पोट भरण्यासाठी नोकऱ्या करणाऱ्यांना, शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे राजकारण करून त्या पैशीकरणाच्या व्यवस्थेत पळून जाणाऱ्या म्होरक्यांना आणि शेतीमाल किती महाग झाला, यावरून गळा काढणाऱ्या मध्यमवर्ग म्हणविणाऱ्या उपऱ्यांना हे नाकारलेपण कसे कळणार?



## शेतकऱ्यांच्या आत्महत्या : ठोस उत्तरासाठी जाहीर मंथन

शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा समजावरील कलंक पुसून टाकण्यासाठी जाहीर मंथन आयोजित करण्यात येणार आहे. शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नावर ठोस उत्तर समोर यावे, असा त्याचा हेतू असेल. आपल्याला या मंथनात काही भूमिका बजावायची असल्यास त्याविषयी editor.arthapurna@gmail.com या इमेलवर संपर्क साधावा.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील सर्व गावे आणि शहरांत वाचकांना 'अर्थपूर्ण' मिळावा, यासाठी प्रतिनिधी नियुक्त केले जात आहेत. प्रतिनिधी होऊ इच्छिणाऱ्यांनी पुण्यातील कार्यालयाच्या पुढील फोन नंबर वर 020- 25430540 **किंवा** **arthapurna.monthly@gmail.com** **या इमेलवर संपर्क साधावा.**